# स्त्रियांमधील श्वेतप्रदर विकार आणि त्यावरील होमिओपॅथिक उपचार




होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

डॉ. अमरसिंह निकम


Leucorrhoea म्हणजे श्वेतप्रदर. स्त्रियांमध्ये योनी मार्गातून पांढरट स्राव जाणे म्हणजे श्वेतप्रदर. या व्हजायनामार्फत होणाऱ्या स्रावामुळे जीवाणूंना शरीरात शिरकाव करण्यास अटकाव केला जातो. सामान्यतः होणारा हा स्राव दुर्गंधविरहित, पांढरट पारदर्शक असतो. असा हा स्राव सतत स्त्रियांमध्ये होत राहतो. ज्याद्वारे योनीमार्ग स्वच्छ ठेवण्यात येतो, परंतु जेव्हा हा पांढरट, पिवळा, घट्ट, दुर्गंधीयुक्त स्राव स्ट्रोजेन संप्रेरकाच्या असंतुलनामुळे किंवा योनीमार्गातील जंतुसंसर्गामुळे उद्भवतो, तेव्हा औषधोपचारांची गरज पडते. काही स्त्रियांमध्ये श्वेतप्रदराच्या तक्रारी पुन्हा पुन्हा उद्भवतात. काहींमध्ये त्या प्रदीर्घ कालावधीसाठी होतच राहतात.

स्त्रियांमध्ये योनीमार्ग बाहेरील बाजूने चपट्या पेशींनी, मध्यस्थ पृष्ठपेशींनी आच्छादलेला असतो. सर्वांत बाहेरच्या पेशी सतत झडून जातात. पृष्ठ पेशींमार्फत नवीन पेशी तयार होतात. या दोन पेशींतर्गत स्ट्रोजेन संप्रेरकामुळे ग्लायकोजेन साठवला जातो.

स्ट्रोजेनचे प्रमाण किशोरवयात जास्त असते. त्यावेळेस या संप्रेरकामुळे ग्लायकोजनचे प्रमाण वाढते. या ग्लायकोजनचे रूपांतर व्हजायनामध्ये सामान्यतः असणाऱ्या जीवाणूमुळे ८ हक्ट्रिक ५ हसिड मध्ये होते. ५हसिडिक पणामुळे इतर जीवाणू किंवा विषाणूंचा संसर्ग रोखला जातो, परंतु जीवाणूच्या अतिसंक्रमणामुळे अहसिडिकपणा कमी होऊन योनीदाह निर्माण होतो.

मासिक पाळी बंद झालेल्या वयोवृद्ध महिलांमध्ये स्ट्रोजेनचे प्रमाण कमी झाल्यामुळे असा स्राव कमी होतो. स्त्रियांमध्ये स्रवणाऱ्या स्ट्रोजेन हार्मोनद्वारा योनी पेशींची लवचिकता राखली जाते. याचबरोबर या हार्मोनद्वारा किशोर अवस्थेत योनी मार्गाला जास्त रक्तपुरवठा होऊन श्वेतप्रदर तयार होतो. त्यामुळेच बऱ्याचशा मुलींमध्ये मासिक पाळी सुरू होण्याच्या आधी असा योनीस्राव सुरू होत असतो. असाच श्वेतप्रदर गरोदरपणातही होतो. अशा योनीस्रावासाठी औषधांची गरज नसते, कारण तो शरीरात होणाऱ्या बदलामुळे निर्माण झालेला असतो, परंतु जेव्हा असा हा योनीस्राव खूपच जास्त प्रमाणात, दुर्गंधीयुक्त व पिवळसर, हिरवट किंवा रक्तमिश्रित, पूमिश्रित असेल तर त्यासाठी ताबडतोब उपचारांची गरज असते.

**प्रकार :**

१. उपचारांची गरज नसलेला सामान्यतः होणारा श्वेतप्रदर : असा श्वेतप्रदर तान्ह्या बाळामध्ये जन्मानंतर काही आठवड्यांसाठी मातेच्या शरीरातील इस्ट्रोजेन हार्मोनच्या प्रभावामुळे होतो. तसेच किशोरवयातील मुलींमध्ये मासिक पाळी येण्याच्या कालावधीत हार्मोन्समध्ये होणाऱ्या बदलांमुळे होतो. बीजांड फलोत्पादित होणाऱ्या कालावधीत, तसेच गरोदरपणातील सुरुवातीच्या काळात आणि लैंगिक उत्तेजनाच्या कालावधीत होतो.

२. उपचारांची गरज असलेला श्वेतप्रदर :

जीवाणू विषाणूंच्या संसर्गामुळे श्वेतप्रदर होत असल्यास किंवा कुपोषणामुळे, मानसिक ताणतणावामुळे, इतर काही आजारपणामुळे श्वेतप्रदर होत असल्यास ताबडतोब उपचारांची गरज असते.

**लक्षणे :**

१. योनीस्रावामुळे सतत अशक्त, निरुत्साही वाटत राहणे. २. कंबरदुखी, पोटात ओढल्यासारखे वाटत राहते. ३. पाय दुखणे. ४. योनीमार्गात कंड सुटणे. ५. सतत बद्धकोष्ठता किंवा डोकेदुखीचा त्रास होणे. ६. सतत चिडचिडेपणा निर्माण होतो.

**कारणे :**

योनीस्राव हा एकाएकी अचानक उद्भवत नाही तर तो शरीर कमकुवत झाल्यामुळे शरीरात साठून राहिलेल्या घातक VkW(श्ह्यहक्सिन्स) पदार्थांचा परिणाम आहे. यामध्ये जननेंद्रियाचा, इतर अवयवांचा देखील, जसे की गर्भाशय, बीजांड, ग्रीषा यांचादेखील समावेश होतो. जेव्हाही चुकीच्या खाण्याच्या सवयी, मानसिक ताणतणाव यामुळे शरीरातील पेशींना प्राणवायूचा व्यवस्थित पुरवठा होत नाही. त्यावेळी घातक पदार्थ शरीरात साठून राहतात. त्यावेळेस त्वचा, फुफ्फुस, किडनी, गुदद्वारामार्फत, घाम, लघवी, संडास, कफ, तसेच योनीस्राव याद्वारा शरीरातील हे स्राव जास्त प्रमाणात स्रवले जाऊन घातक पदार्थ शरीराबाहेर फेकून देण्याचा प्रयत्न केला जातो. जर हे स्राव चुकीच्या औषधांनी दडपले गेले तर गंभीर आजारांची सुरुवात होते. अशावेळेस योग्य त्या सर्वांगीण उपचारांचा वापर करूनच म्हणजेच होमिओपॅथिक औषधांनी हे श्ह्यहक्सिन्स घटक शरीराबाहेर फेकले जातात व रोगमुक्ती होते.

१. जीवाणू, विषाणूंचा किंवा बुरशी संसर्ग सतत लघवीतून होणाऱ्या जंतुसंसर्गामुळे श्वेतप्रदर होतो. २. योनी भागातील अस्वच्छता हेदेखील या आजाराचे कारण आहे. ३. प्रसूतीच्या वेळी योनीमार्गाला, गर्भाशयाला होणाऱ्या जखमा. ४. गर्भनिरोधक साधनांच्या वापरामुळे गर्भाशयाला होणारा दाह. ५. असुरक्षित शारीरिक संबंधातून निर्माण होणारे आजार जसे की, गनोऱ्हीआ, ऊ८हीहडीया एच.आय.व्ही. ६. योनीमार्गाचा, गर्भाशयाचा, बीजांडाचा हिन्सर, बीजांडाचे आजार यामुळेही श्वेतप्रदर होतो. ७. आहारात पोषक अन्नघटकांची कमतरता हेदेखील योनीस्रावाचे मुख्य कारण आहे. ८. योनीदाह हा हिनडिडा, प्रोटोजोआ, ट्रायकोमोनाड यामुळेही होतो.

**टाळण्याचे उपाय :**

१. शांत झोप, नियमित व्यायाम, मोकळ्या वाऱ्यात फिरायला जाणे, यामुळे तुम्ही श्वेतप्रदर रोखू शकता. २. शारीरिक स्वच्छता बाळगणे. ३. खाण्यात फळांचा, हिरव्या पालेभाज्यांचा भरपूर वापर करणे. ४. जंक फूडचा, चहा, कॉफीचा, बाहेरील खाद्यपदार्थांचा अतिरेक टाळावा.

**केस.**

ही एका ४८ वर्षांच्या महिलेची केस आहे. ज्यांना श्वेतप्रदराचा त्रास एका वर्षापासून होत होता. वयाच्या ३५ व्या वर्षीच मासिक पाळी बंद झाल्यानंतर असा त्रास उद्भवल्यामुळे त्या घाबरल्या होत्या. वेळोवेळी विविध उपचार करूनदेखील त्यांना बरे वाटत नव्हते. त्यामुळे शेवटी त्या होमिओपॅथीकडे वळल्या.

**तक्रारी :**

१. अंगावरून पिवळट, चिकट स्राव होणे. योनीमार्गात दाह होऊन खाज सुटणे, त्याचबरोबर डोळ्यांमध्ये, हात, पायाची आग होणे. संध्याकाळच्या वेळी, श्रमानंतर, रात्री जागरणानंतर स्राव वाढणे. कोमट पाण्याच्या वापराने खाज कमी होणे. २. जुनाट कंबरदुखीचा त्रास : कंबरेपासून खाली पायापर्यंत वेदना होणे, कंबरेत आखडलेपणा जाणवणे, पाठीवर झोपल्यावर, चालताना, जिने चढउतार करताना, कंबर दुखणे, कुशीवर झोपल्यावर बरे वाटणे.

**विशेष माहिती :**

१. खाण्यात गोडाची आवड, दुधाची नावड. २. दुपारच्या जेवणानंतर ३ ते ४ दरम्यान ५हसीडीटीचा त्रास होतो. ३. तिखट पदार्थ खाल्ल्यानंतर गुदद्वाराला आग होणे. ४. डोक्यावर घाम जास्त प्रमाणात येणे. ५. उष्ण प्रकृती.

**स्वभाव :**

तुमच्या स्वभावाबद्दल सांगा.

माझा स्वभाव लहानपणापासूनच भित्रा आहे. मला प्राण्यांची, अंधाराची खूप भीती वाटते. मी घरात एकटी राहू शकत नाही. सतत कोणीतरी बरोबर असावे असे वाटते. कोणी मला काही बोलले तरी मी प्रत्युत्तर देऊ शकत नाही. मला पटकन कुठल्याही गोष्टीचे दडपण येते. मला स्वतःची मतेसुद्धा मांडायला जमत नाही.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व :**

१. भित्रा स्वभाव, २. सोबतीची गरज, ३. दबाव सहन करण्याची वृत्ती, ४. अंधाराची भीती, ५. खाण्यात गोडाची आवड, ६. संध्याकाळच्या वेळी तक्रारीत वाढ होणे, ७. डोक्यावर घाम येणे, ८. गुदद्वार, हात, पायाची आग होणे, ९. अतिश्रमामुळे योनीस्रावात वाढ होणे, १०. पाठीवर झोपल्यावर कंबरदुखीचा त्रास वाढणे, कुशीवर झोपल्यावर बरे वाटणे, ११. उष्ण प्रकृती.

**प्रतिसाद :**

वरील लक्षणांवरून मी त्यांना होमिओपॅथिक औषध सुरू केले, एकाच आठवड्यात त्यांची खाज व अस्वस्थपणा कमी झाला, स्रावाचे प्रमाण कमी झाले, योनीस्रावाबरोबरच त्यांच्या ५हसिडीटी, कंबरदुखीच्या तक्रारी हळूहळू कमी होऊन नाहीशा झाल्या.

होमिओपॅथिक रोगमुक्ती ही निसर्गनियमांवर आधारित आहे. हार्मोनल बॅलन्स कमीजास्त न होता व कोणतेही दुष्परिणाम शरीरावर न होता शरीरातले VkW श्ह्यहक्सिन्स बाहेर काढणाऱ्या स्रावांना चालना मिळून ते उत्तेजित होतात आणि शरीरातील VkW श्ह्यहक्सीनचा निचरा होत रोगमुक्तीकडे प्रवास होत जातो.


आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल,
हनुमान मंदिराजवळ, स/नं. ३०९/१/२,
शिवाजी चौक, पिंपरी गाव, पुणे -१७
फोन नंबर - ०२०-२७४१२१९७/२७४१२५४९


# नववर्षनिमित्ताने हॉटेल्सवर एफडीएची नजर

**पुणे :** नववर्षाच्या स्वागतासाठी तारांकित हॉटेल अधिक सुरक्षित बनाव्यात या दृष्टीने एफडीए विभागामार्फत तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर येथील एफडीएचे सहायक आयुक्त व अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तशा सूचना केकरे यांनी आज दिल्या.

३१ तारखेच्या निमित्ताने ज्या तारांकित आणि बाकीच्या मोठ्या हॉटेल्समध्ये पार्ट्या होणार आहेत, अशा हॉटेल्सच्या तपासणीचा ड्राइव्ह सोमवारपासून सुरू झाला. यात अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या परिशिष्ट ४ नुसार तपासण्या होणार आहेत. प्रामुख्याने हॉटेलचे स्वयंपाकघर तपासले जाईल. आवश्यक तेथे अन्नाचे नमुने घेण्यात यावेत, तसेच साठा जप्त करण्याची कार्यवाही करावी, असे पत्रक केकरे यांनी एफडीएतर्फे काढले आहे. २८ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत ही मोहीम होईल.

दरवर्षीप्रमाणे ३१ डिसेंबर रोजी ठिकठिकाणी पार्ट्या, कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यावेळी विविध तारांकित हॉटेल्समध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. ३१ डिसेंबरच्या रात्री आयोजित करण्यात येणाऱ्या पार्ट्यांवर अन्न आणि औषध प्रशासन म्हणजेच एफडीएची करडी नजर असणार आहे. पार्टी ठेवताना एफडीएचा एक दिवसाचा परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच अन्न किंवा मद्यातून भेसळ होऊ नये यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाचे २०० अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. शहरात ३१ डिसेंबरच्या रात्री आयोजित करण्यात येणाऱ्या पार्ट्यांमध्ये ग्राहकांना निकृष्ट खाद्यपदार्थ दिले जाऊ नयेत म्हणून २३ फूड इन्स्पेक्टर कार्यरत असणार आहेत. या पार्ट्यांमध्ये ग्राहकांना बनावट दारू दिली जाण्याची शक्यता असल्याने एफडीएकडून दारूचे नमुने घेतले जाणार आहेत. दोषी पार्टी नियोजकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती एफडीएचे सहआयुक्त शशिकांत केकरे यांनी दिली.

# एक लाखापेक्षा अधिक व्यक्तींना टीबी संसर्ग

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य आरोग्य विभागातर्फे स्थानिक पातळीवर विविध उपाययोजना करूनही टीबी रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. शासनाच्या अहवालानुसार गेल्या ९ महिन्यांत १ लाखाहून अधिक जणांना टीबीचा संसर्ग झाल्याची माहिती समोर आली आहे. नोंदणी न झालेल्या रुग्णांची संख्या यापेक्षाही अधिक असल्याचे मत वैद्यकीय तज्ज्ञांनी नोंदविले आहे.

राज्यासह देशातील टीबी रुग्णांची संख्या वाढत असल्याचे अहवालानुसार स्पष्ट झाले आहे. राज्यात दररोज तीनशेहून अधिक जणांना टीबीचा संसर्ग होत आहे. हा संसर्ग आटोक्यात आणण्यासाठी टीबीची औषधे दररोज नियमित द्यावीत, अशी शिफारस वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने (डब्लूएचओ) केली आहे.

हा अभिनव प्रयोग महाराष्ट्रासह देशातील बिहार, केरळ, हिमाचल प्रदेश, सिक्कीम या पाच राज्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. डायरेक्ट ऑब्जवर्ड ट्रीटमेंट (डॉट्स) मार्फत सर्व सरकारी रुग्णालयांत सोमवार, बुधवार, शुक्रवारी टीबीची औषधे देण्यात येतात. मात्र, अनेकदा या औषधांचे रेशनिंग केले जाते.रुग्णांना सेकंड लाइनच्या औषधांचा प्रचंड तुटवडा जाणवतो. रुग्णांना औषधे नियमित उपलब्ध होत नाहीत, परिणामी औषधे वेळेवर घेता येत नाहीत. या पार्श्वभूमीवर वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने औषधांचा नियमित पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. याच्या पहिल्या टप्प्यात देशातील महाराष्ट्र, बिहार, केरळ, हिमाचल प्रदेश, सिक्कीम या चार राज्यांतील तब्बल १०४ जिल्ह्यांत टीबीची औषधे दररोज देण्यात येणार आहेत.

> टीबीसाठी वापरल्या जाणाऱ्या सेकंड लाइन औषधांची शासनाला कमतरता जाणवत आहे, तसेच ही औषधे महाग असल्याने खासगी मेडिकलमधून रुग्णांना ती घेणे शक्य होत नाही. प्रत्येक रुग्णाकडे वैयक्तिक स्तरावर लक्ष देण्याची क्षमता शासकीय व्यवस्थेकडे नसल्याने रुग्णांची संख्या कमी होणे आव्हानात्मक होत आहे.
>
> **- डॉ. नितीन अभ्यंकर, छातीविकारतज्ज्ञ**

> टीबी निदानाची अत्याधुनिक चाचणी करण्याची २२ यंत्रे राज्यात कार्यरत आहेत, तसेच ग्रामीण व शहरी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये अशा एकूण १४२२ केंद्रांवर क्षयरोग निर्मूलनासाठी काम चालू आहे. शासकीय सेवेचा टीबी रुग्णांनी लाभ घ्यावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
>
> **- डॉ. संजीव कांबळे, उपसंचालक, आरोग्य विभाग**

**२०१५ मधील राज्यातील आकडेवारी (हजारामध्ये)**

| महिने | रुग्ण |
|---|---|
| जानेवारी ते मार्च | ३१,८७१ |
| एप्रिल ते जून | ३२,८३१ |
| जुलै ते सप्टेंबर | ३२,२१५ |


छोटे अंग निराश का



जपानी पट्टीनुमा Vaccum Therapy

अंगाचा आकार आणि सेक्स पावरमध्ये वाढ शक्य

FDA चेसुद्धा मानने आहे की VACCUM THERAPY आणि आयुर्वेदिक औषधींद्वारा तुम्ही तुमच्या अंगाच्या आकारात वाढ करुन सेक्स क्षमता वाढवू शकता. शीघ्रपतन, नपुंसकता, अंगाचा लहाणपणा, पातळपणा, वाकडेपणा दूर करुन सुडौल आणि मनासारखा सेक्स टाईम मिळवू शकता. ३० दिवसाच्या औषधीसोबत १६ जीबी मेमरी कार्ड मोफत. NO SIDE EFFECT

09178726578
09090549912



लग्नापुर्वी वा लग्नानंतर

सैक्स समस्या



फोन करुन मोफत सल्ला घ्या

लहानपणीच्या चुकांमुळे यौन दुर्बलता, सैक्सची कमतरता, शीघ्रपतन, मर्दानी कमजोरीने हताश झालेल्या स्त्री-पुरुष, लग्नापूर्वी किंवा लग्नानंतर फोन करुन मोफत सल्ला घ्या. घरी बसल्या औषधी मिळवा.

आपले नाव व पत्ता गुप्त ठेवला जाईल.

09212048300 अकबर
09555137800 दवाखाना


# व्यावसायिकास लुटल्याप्रकरणी सातजणांना अटक

**पुणे :** व्यावसायिकाच्या कार्यालयामध्ये घुसून त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन ६० हजार रुपयांची रोकड लुटल्याप्रकरणी सातजणांना वारजे माळवाडी पोलिसांनी अटक केली. धाणेश्वर बसवराज हिरेमठ (वय १९, रा. वारजे), शुभम कृष्णा मानकर (वय १९, रा. शिवणे), रोहित वसंत पासलकर (वय २३), मनोज ऊर्फ ऋषीकेश सदाशिव आदमाने (वय २०), आकाश ऊर्फ सोन्या विष्णू आखाडे (वय २१), सूरज ऊर्फ केळ्या राजेंद्र केळगंद्रे (वय १९, रा. वारजे माळवाडी), शंकर प्रल्हाद हरणे (वय १९, रा. शिवणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. अश्विन ओसवाल (वय ३५, रा. बिबवेवाडी) यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे.

# 'वेदना परिहार' ही संकल्पना सर्व स्तरांवर पोहोचणे आवश्यक

**पुणे : प्रतिनिधी**

भारतात दरवर्षी साधारणपणे ९० लाख नागरिक मरण पावतात. यापैकी ६० टक्के मृत्यू हे दीर्घकालीन दुर्धर आजारांमुळे होतात. अशा जीवनात अखेरचे श्वास घेणाऱ्या रुग्णांना औषधापेक्षा संवेदना जास्त महत्त्वाची असते. यासाठी 'वेदना परिहार' ही संकल्पना सर्व स्तरांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

बदलत्या आधुनिक जगात तंत्रज्ञान आणि उपचारपद्धती कितीही विकसित झाल्या तरी दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णाला संवेदनेची एक फुंकर लाखमोलाची असते. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात वेदना परिहार (पॅलिएटिव्ह केअर) या संकल्पनेला अत्यंत महत्त्व आहे. द इकॉनॉमिक इंटेलिजन्सच्या अहवालातून हे सत्य समोर आले असून, हिंदुस्थानला ८७ देशांच्या यादीत ६७ वे स्थान मिळाले आहे.

आजारी रुग्णाला औषधे तर द्यावीच; पण त्याच वेळी त्याच्या आवडीनिवडी जाणून घेत, जीवनाच्या अखेरीस त्याने खूश राहावे यासाठी पथ्यपाण्याकडे काहीअंशी दुर्लक्ष करीत मागेल ते द्यावे, भेटायची इच्छा असेल त्याला भेटू द्यावे, याची सर्वाधिक गरज आहे. तथापि ही सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने या रुग्णांची परवड होते. दुर्धर आजारी रुग्णांचा मृत्यू बऱ्याचदा आयसीयूमध्येच होतो. जगाचा निरोप घेताना आपली जिवाभावाची माणसं, आपले कुटुंबीय जवळ असावेत, अशी त्यांची अपेक्षा असते. पण दुर्दैवाने त्यावेळी कोणीही त्यांच्याजवळ नसते. आयसीयूमधल्या मशिन्सच्या जाळ्यातच त्यांना अखेरचा श्वास घ्यावा लागतो. रुग्णाच्या अंतिम समयी होणारी ही मानसिक वेदना टाळावी यासाठी वैद्यकीय क्षेत्रात 'वेदना परिहार' ही संकल्पना आहे. भारतात मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असून, जगाच्या तुलनेत आपण ६७ व्या क्रमांकावर असल्याचे अहवालात दिसून आले आहे.

'द इकॉनॉमिक इंटेलिजन्स युनिटने क्वालिटी ऑफ डेथ इंडेक्स या वेदना परिहार संदर्भात जगभरातील ८७ देशांचा अभ्यास केला. त्यात इंग्लंडने अव्वल स्थान पटकावले असून, हिंदुस्थान मात्र ६७ व्या स्थानावर आहे. त्यातल्या त्यात आपल्या देशात केरळ हे राज्य वेदना परिहार उपचारपद्धतीत अग्रेसर आहे. बाकीच्या राज्यांत मात्र वेदना परिहाराबाबत धोरणही नसल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.


Govt Reg.No.7342

पेन केअर सेंटर

मुंबई, पुणे, नगर, नाशिक, औरंगाबाद

विना ऑपरेशन विना दुष्परिणाम

जॉईंट ॲण्ड स्पाईन




पेन मोड्युलर इंजेक्शन थेरेपी

या पध्दतीमध्ये काही विशिष्ट बिंदुना इंजेक्शन देऊन नसावरील दाब, सुज कमी करण्यात येते. ही पध्दत ज्यांना कमरेचे किंवा मानेचे ऑपरेशन सांगितले आहे ते टाळण्यासाठी एक वरदान ठरले आहे. या इंजेक्शन व्दारे सांध्याचे ल्युब्रीकेशन वाढुन सांधे बदलण्याचे ऑपरेशन टाळता येतात. या पध्दतीमुळे सांधेवातासाठी लागणाऱ्या गोळया ९० टक्यांपर्यंत कमी करता येतात. या इंजेक्शनचे कोणतेही साईड इफेक्ट नाहीत.

अत्याधुनिक अल्टरनेटीव्ह, हायटेक उपचार

जॉईंट ल्युब्रीकेशन थेरेपी (वेळ - स.८ ते दु. ३)

पुणे - जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग (कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार

मो. 9420808990, 9403354523, 9822899660



विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी सेक्स तज्ञांचा सल्ला व आयुर्वेदिक औषधी उपलब्ध



हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, शिथिलता, हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग,

मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता

ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.

ॲझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक

गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला,डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.

7875451644, 8657122333

औषधीसाठी. संपर्क - 7769856821


# सफाई कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य

## अधिकाऱ्यांचे आश्वासन : लालबिगे

**पुणे : प्रतिनिधी**

अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसच्या वतीने प्रलंबित प्रश्नांवर निर्णय न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रीय अध्यक्ष सतीश लालबिगे यांनी दिला होता. याबाबत बैठक होऊन अखेर सफाई कर्मचाऱ्यांच्या मागण्या करण्यात आल्याची माहिती लालबिगे यांनी दिली.

पुणे महानगरपालिका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसंबंधी निर्णायक स्वरूपाची अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस युनियनचे अध्यक्ष सतीश लालबिगे व पदाधिकारी व मनपाचे अधिकारी यांच्यामध्ये बैठक झाली. यावेळी १३० भैरोबा पं. स्टे. येथील कामगारांना नोटीस न देता कामावरून काढले त्यांना त्वरित कामावर घेण्यात यावे. भैरोबा, नायडू, पर्वती व लष्कर जलशुद्धीकरण केंद्र येथील घाणीत काम करणाऱ्या कामगारांना घाण भत्ता लागू करण्यात यावा. मनपामध्ये अतिआवश्यक सेवेत विविध ठिकाणी रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना कायमस्वरुपी भरती करण्यात यावे आदी मागण्या व समस्या मान्य करून त्वरित निर्णय देण्याचे आश्वासन दिले. पुणे मनपा अधिकारी यांनी संघटनेला न्याय मिळवून दिलेला आहे. त्यांच्या या सहकार्याबद्दल व धाडसी निर्णयाबद्दल अखिल भारतीय सफाई मजदूर संघटनेच्या वतीने जाहीर आभार मानण्यात आले. यावेळी रत्ना काळे, तेजस्विनी सडेकर, सुषमा वेदपाठक, संभाजीराव देशमुख, अमित भारवासी, अडसूळ, मापारे, भोसले, मोडक, डोळ उपस्थित होते.

# आपलं व्यासपीठ

## शौचालय बांधा

सन्मानाने जगण्याच्या दृष्टीने सर्वत्र स्वच्छ व सुरक्षित शौचालये उपलब्ध असणे, हा महिलांचा व पुरुषांचा हक्कच आहे आणि तो पुरविणे हे राज्य सरकार व महापालिकेचे परमकर्तव्य आहे. तसेच कचरा जिरविण्यासाठी आरोग्य कोठ्यांची सुद्धा गरज वाढली आहे, परंतु रस्त्यांवर आरोग्य कोठ्या व शौचालये बांधताना वाहतुकीला अडथळा होणार नाही याचीसुद्धा खबरदारी घेतली पाहिजे, तसेच स्थानिक नागरिकांना आरोग्य कोठ्यांमुळे दुर्गंधी व कचऱ्यामुळे आरोग्यास हानी होणार नाही याचीसुद्धा दक्षता घेतली पाहिजे. असे न होता फक्त लोकप्रतिनिधींचा निधी संपवण्यासाठी शौचालये व आरोग्य कोठ्या रस्त्यांवर बांधणे म्हणजे नागरिकांच्या घामाच्या व कष्टाच्या रूपाने जो कर घेतला जातो तो पैसा वाया जाणे किंवा नागरिकांच्या सोयीसाठी तो वापरला जात आहे, असे दाखवून आपली घरे भरणे. असे प्रकार न होता तो नागरिकांच्या सेवेसाठीच प्रामाणिकपणे खर्च केल्यास कारणी लागेल. यासाठी प्रशासन, शासन, लोकप्रतिनिधी यांनी इच्छाशक्ती व नियोजन करावे.

**- अनिल बाळासाहेब अगावणे**
**नारायण पेठ पुणे**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.


पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com